REGISTERED No. B. 3434




# अर्थ

" अर्थ एव प्रधानः " इति कौटिल्यः अर्थमूलौ धर्मकामाविति । —कौटिलीय अर्थशास्त्र

वर्ष १४ | पुणें, बुधवार तारीख १४ जानेवारी १९४८ | अंक २


दि
प्रेसिडेन्सी इंडस्ट्रियल
बँक
लि.
प्रेसिडेन्सी बँक बिल्डिंग
पुणें २.

| | |
|---|---|
| अधिकृत, विक्रीस काढलेलें | |
| व खपलेलें भांडवल | रु. १०,००,०४३ |
| जमा झालेलें भांडवल | रु. ७,०८,१९५ |
| खेळतें भांडवल | रु. ६५,००,००० |

मुंबई शाखाः—इस्माईल बिल्डिंग, हॉर्नबी रोड, मुंबई १

श्री. ग. रा. साठे, अध्यक्ष. श्री. दा. ग. बापट, उपाध्यक्ष.

बँकिंगचे सर्व व्यवहार केले जातात.

" बँक शिड्यूल्ड बँक झाली आहे. "

श्री. गो. धों. जोगळेकर, बी. ए. (ऑ.), बी. कॉम., एलएल. बी., मॅनेजर

श्री. सी. टी. चितळे, मॅनेजिंग डायरेक्टर

आरको

प्रत्येकास लागणारी नित्योपयोगी वस्तू
आरको निलगिरी तेल
लक्ष्मी एजन्सी, मुंबई २४







# विविध माहिती

**विमान-वहातुकींत नुकसान**—१९४७ सालअखेर ब्रिटिश ओव्हरसीज कॉर्पोरेशन ह्या सरकार नियंत्रित विमान-वहातुकीच्या संस्थेला ८०,७६,८४४ पौंड नुकसान आलें. संस्थेनें आर्थिक दृष्ट्या न परवडणारीं विमानें वापरलीं, एक जरूर त्या प्रकारचीं विमानें कंपनीला वेळेवर मिळूं शकलीं नाहींत आणि दूरदूरचे व तात्पुरते विमान-तळ संस्थेला वापरावे लागले, अशीं कारणें नुकसानीबद्दल देण्यांत आलीं आहेत. १९४७ सालीं ब्रिटिश युरोपिअन एअरवेज ह्या सरकार-नियंत्रित संस्थेलाही २०,००,००० पौंड नुकसानी आली.

**जमशेटपूरमधील पोलादाचें उत्पादन**--डिसेंबर १९४७ मध्यें जमशेटपूर येथील पोलादाच्या कारखान्यांत पुढीलप्रमाणें उत्पादन झालें:- लोखंड ८२,६०० टन; पोलाद ७७,९०० टन.

**त्रिपुरा संस्थानांत तेलाची खाण**— बंगालमधील त्रिपुरा संस्थानच्या पश्चिम भागांत तेलाच्या खाणीचा शोध लागला आहे. तेलाच्या खाणीचे एंजिनिअर्स आणि इतर तज्ज्ञ ह्यांनीं खाणीसंबंधीं प्राथमिक तयारीला प्रारंभ केला आहे.

**फ्रान्समधील परदेशस्थांना इषारा**—फ्रान्समधील परकीय देशाच्या रहिवाशांना सरकारनें असा इषारा दिला आहे कीं, त्यांनीं कामगार वर्गाच्या निदर्शनांत भाग घेतल्यास त्यांना देशांतून बाहेर घालविलें जाईल.

**रॉकेलवरील नियंत्रण**—सुरत आणि बलसार शिधाक्षेत्रांतील रॉकेल तेलावरील नियंत्रण उठविण्यांत आल्याचें जाहिर झालें आहे.

**स्वतंत्र हिमालय-प्रांत बनवा**—हिमालयाच्या लगतच्या भागांतिल संस्थानांच्या लोकांची परिषद् नुकतीच भरली होती. ह्या भागांतील संस्थानांचा एक स्वतंत्र प्रांतच बनविण्यांत यावा अशी मागणी परिषदेंत करण्यांत आली.

**युगोस्लाव्हिआची अमेरिकेकडे तक्रार**—गेल्या महायुद्धांत जर्मनीनें युगोस्लाव्हिआ व्यापला त्यावेळीं सरकारच्या मालकीचें ४ ते ५ कोटी डॉलर्सचें सोनें अमेरिकेंत हलविण्यांत आलें होतें. हें सोनें अमेरिका परत करण्याचें नाकारीत असल्याची युगोस्लाव्हिआनें तक्रार केली आहे.

**राजाचा पुढाकार**—कोळशाच्या बचतीसंबंधीं ब्रिटिश सरकारनें काढलेलीं विनंतिपत्रकें ग्रेट ब्रिटनच्या राजानें आपल्या सर्व राजवाड्यांत चिकटवून कोळसा वांचविण्याचे कामीं पुढाकार घेतला आहे.

**लॉर्डांच्या सभागृहाच्या स्त्री सभासद**—लॉर्डांच्या सभेंत स्त्रियांनाहि बसण्याचा अधिकार असावा, अशी चळवळ ग्रेटब्रिटनमध्यें सुरू आहे. ती यशस्वी झाल्यास लॉर्डांच्या सभागृहांत २२ नव्या सभासदांची भर पडेल.

**अमेरिकन गव्हाची निर्यात**— यंदाच्या शेतीच्या हंगामाच्या वर्षी अमेरिकेंतून फक्त ४५ कोटी बुशेल गहूच निर्यात होऊं शकेल असें समजतें. इतकी निर्यात करून अमेरिकेजवळ वर्ष अखेर १५ कोटी बुशेल गहूं शिलक राहील. गेल्या पावसाळ्याच्या सुमाराला प्रे. ट्रुमन ह्यांनीं निर्यातीचा जो आंकडा जाहीर केला होता, त्यापेक्षां अपेक्षित निर्यात ५ कोटी बुशेल्सनीं कमी आहे.

**रेडिओवर मोहनास्त्र**—सिडने येथील ध्वनिक्षेपक यंत्रावरून मोहमूर्छनाची ( हिप्नॉटिझम ) विद्या अवगत असलेल्या एका जादूगारानें ऐकणाऱ्या २० लोकांवर मोहिनी पसरली आणि बरेच जण मूर्छित केले अशी बातमी प्रसिद्ध झाली आहे.


## पूना केमिकल्स अ‍ॅण्ड फर्टिलायझर्स लिमिटेड

रजिस्टर्ड ऑफिसः—३३४/३५ नारायण पेठ, पुणें २.

★ शेअर-विक्री सुरू आहे ★

(i) ५% क्युम्युलेटिव्ह प्रेफरन्स शेअर, प्रत्येकीं रु. १०० चा एक.

(ii.) ऑर्डिनरी, प्रत्येकीं रु. ५० चा चेक.

भरणा—अर्जासोबत निम्मी रक्कम. राहिलेली रक्कम ३ महिन्यांनीं कंपनी मागणी करील त्यावेळीं द्यावयाची आहे.

कंपनीने कमेन्समेंट ऑफ बिझिनेसचें सर्टिफिकेट मिळवून कारखान्याच्या कामास सुरवात केली आहे. शेतकरी, बागाईतदार शेअरहोल्डर्संना कंपनी येत्या सीझनपासूनच सवलतीच्या दरानें व कंट्रोल भावांत पेंड व खतें देण्यास सुरवात करील. शेअर्स घेतल्याशिवाय कंपनी कोणत्याही शेतकऱ्यास पेंड अगर खतें देणार नाहीं. कोणताहि एक शेअर घेणाऱ्या शेतकऱ्यास ५ पोतीं पेंड अगर खत सवलतीच्या भावांत कंपनी नेहमीं देत राहील. म्हणून ज्यांना पेंडीची अथवा खताची गरज असेल त्या प्रमाणांत त्यांनीं शेअर्स घ्यावेत.

(iii) कंपनीची सर्व शेअर-विक्री लवकरच पुरी होणार आहे. तरी सर्व शेतकरी, बागाईतदार वगैरेंनीं या संधीचा अवश्य फायदा घ्यावा.

शेअर-मागणी अर्ज व अितर माहितीकरितां लिहाः—

मे. लोणकर अ‍ॅण्ड को.,
मॅनेजिंग एजण्ट्स्.



## दि युनायटेड कमर्शिअल बँक लि.

हेड ऑफिस : कलकत्ता

पुणें शाखा : दाणे-आळी, पुणें २

पुणें कँटोन्मेंट शाखा २० जानेवारी १९४८ रोजीं सुरू होणार

| | |
|---|---|
| अधिकृत भांडवल : | ८ कोटी रु. |
| विक्रीस काढलेलें भांडवल : | ४ कोटी रु. |
| वसूल भांडवल : | २ कोटी रु. |
| रिझर्व्ह फंड : | ३० लक्ष रु. |

डायरेक्टर्स

जी. डी. बिर्ला
चेअरमन

एम. ए. इसपहानी, व्हॉईस चेअरमन — रमणलाल जी. सरय्या, व्हॉईस चेअरमन
अदमजी हाजी दाऊद — महादेव एल. डहाणूकर
अनंत चरण लॉ — मोहनलाल शहा
बैजनाथ जालन — मोतीलाल टापरिआ
ईश्वरी प्रसाद गोयेंका — नविनचंद्र मफतलाल
पी. डी. हिंमतसिंगका — मदनमोहन आर. रुइया

बी. टी. ठाकूर
जनरल मॅनेजर

व्ही. आर. सोनाळकर, डे. जनरल मॅनेजर — एस. टी. सदाशिवन्, डे. जनरल मॅनेजर
ओ. एच. धीवाला, रिजनल मॅनेजर — व्ही. व्ही. गुप्ते, मॅनेजर, पुणें शाखा

# अर्थ

बुधवार, ता. १४ जानेवारी १९४८



संस्थापक

प्रो. वा. गो. काळे

संपादक :
श्रीपाद वामन काळे

वा. वर्गणी ट. ख. सह ६ रु. किरकोळ अं. २ आणे.


## महाराष्ट्र सहकारी परिषदेपुढील महत्त्वाचे प्रश्न

पुणें येथें जानेवारी १९४८ च्या तारीख १७ व १८ ह्या दिवशीं महाराष्ट्र विभाग सहकारी परिषद् प्रा. धनंजयराव गाडगीळ ह्यांचे अध्यक्षतेखाली होणार आहे. सहकारी परिषद् पूर्वी ठराविक वर्षांनीं होत असे. परंतु, प्रांतिक स. इन्स्टिटयूटच्या जिल्हा व विभाग शाखा बंद झाल्यानंतर म्हणजे सुमारें १५ वर्षांनंतर ही सहकारी परिषद् आतां भरत आहे. तिचेमध्यें युद्धोत्तर आर्थिक परिस्थितीबाबत प्रश्न चर्चिले जाणें क्रमप्राप्तच आहे. त्याचप्रमाणें परिषदेमध्यें सहकारी चळवळींतील चालू प्रश्नांचा व अडी-अडचणींचा विचार होऊन शिवाय तिच्या भावी धोरणासंबंधींहि चर्चा होईल असें धरुन चालण्यास हरकत नाहीं.

आज सहकारी चळवळीच्या कार्यकर्त्यांपुढें जर कोणता जिव्हाळ्याचा प्रश्न असेल तर तो म्हणजे शेतकीपतीची पुनर्घटना हा होय. हिंदुस्थान सरकारनें नेमलेल्या दोन समित्यांचे (गाडगीळ समिति व सरय्या समिति) उशीरानें कां होईना अहवाल प्रसिद्ध केले व प्रांतिक सरकारनें ह्या अहवालांस चालना देऊन त्याबाबत पुढें पाऊल टाकण्याचें ठरविलें आहे. गाडगीळ समितीनें मुख्यत: शेतकऱ्याचें कर्ज कमी करून त्यास लागणारें नवें कर्ज कोणत्या पद्धतीनें पुरवावें यासंबंधीं शिफारशी केल्या व सरय्या समितीनें सहकारी चळवळीचा विस्तार कसा वाढवावा ह्याबद्दल सूचना केल्या. ह्यासंबंधीची चर्चा परिषदेमध्यें होऊन त्याबाबत मार्गदर्शक ठराव होतील अशी अपेक्षा आहे.

मुंबई सरकारनें गाडगीळ समितीच्या शिफारशीप्रमाणें मुंबई प्रांतांत शेतकऱ्यांना कर्ज देण्यासाठी सरकार नियंत्रित कॉर्पोरेशन असावी, कां हें काम सहकारी चळवळीकडे द्यावें ह्याबद्दल सहकारी बँक्स असोसिएशनचें मत मागविलें होतें. त्या असोसिएशनच्या शिफारशी प्रमाणें सर मणिलाल नानावटी यांचे अध्यक्षतेखाली एक समिति नेमण्यांत आली. ह्या समितीचा अहवाल प्रसिद्ध झाला असून त्याच्या शिफारशी अमलांत आल्या, तर सहकारी चळवळींत आमूलाग्र फेरबदल होईल असें दिसतें. मुख्यत: प्रांतिक बँक व जिल्हा मध्यवर्ती बँका यांच्या घटना, सोसायटयांवरील देखरेख, सोसायटयांचा नोकरवर्ग, कर्जावरील व्याजाचा दर, सरकारनें सहकारी सोसायटयांस द्यावयाची आर्थिक मदत, कर्जवसुलीबाबत सरकारनें करावयाचें सहाय, वगैरेबाबत विचार फार काळजीपूर्वक करावा लागेल. गाडगीळ समितीनें केलेल्या व्यावहारिक शिफारशींचा अत्यंत काळजीपूर्वक व सहकारी चळवळीची आजवर केलेली जोपासना लक्षांत घेऊन विचार केला पाहिजे. सहकारी चळवळींतील स्वायतत्ता व त्याचप्रमाणें व्यक्तिगत सोसायटयांना स्वायतत्ता ठेवूनच नवीन सहकारी संघटना तयार करावी लागेल व या सर्व दृष्टीनें या परिषदेंत योग्य तें मार्गदर्शन होईल असें आम्हांस वाटतें.

सहकारी चळवळ, आर्थिक नियोजन व नियंत्रण याबाबतचें मुंबई प्रांतिक सरकारचें धोरण स्थिर राहील व राहावें अशीच प्रत्येकाची अपेक्षा आहे, परंतु सध्याची अनिश्चितता लक्षांत घेतां अत्यंत दुःखानें असें म्हणावें लागतें कीं याबाबत साशंकता वाटूं लागली आहे. सहकारी चळवळीचे बाबत ही मूळ अपेक्षा फोल ठरूं नये अशी प्रत्येकाची इच्छा आहे. सरकारनें कांहीं वर्षांपूर्वी सोसायटयांवरील देखरेख त्यांचे प्रतिनिधींकडे दिली व त्या [illegible]चीसाठी रक्कम सरकारी देणगी व सोसायटयांकडील वर्गणीमार्फत दिली जावी असें ठरलें. पुढें सरकारनें हा सर्व खर्च स्वत: करावयाचें योजून सुपरवायझरांच्या नेमणूका स्वत:च करावयाचें ठरविलें, व त्यासाठीं जिल्हा सहकारी युनिअन्सच्या घटनेंत फेरफार सुचविले. याबाबत बिनसरकारी कार्यकर्त्यांचा व जिल्हा युनिअन्सचा दृष्टिकोन निराळा असून नवीन घटनेस त्यांचा विरोध आहे. नानावटी समितीनें याबाबत नवीन योजना सुचविली आहे व त्या दृष्टीनें या प्रश्नासंबंधीं बरीच चर्चा होणें अपरिहार्य आहे.

शेतकऱ्यांची कर्जफेड नियमित व्हावयाची असेल व शेतकऱ्यांस जर त्यांच्या मालाची योग्य किंमत मिळावयाची असेल तर कर्ज व मालविक्री यांची सांगड घालणें जरूर आहे व यासाठी जिल्हानिहाय खरेदी-विक्री संघ व त्यांच्या तालुकानिहाय शाखा व विविध कार्यकारी सोसायटया स्थापन व्हाव्यात अशी कार्यकर्त्यांची अपेक्षा योग्यच आहे. त्याचप्रमाणें, यासाठी योग्य ठिकाणीं मार्केटिंग कायदा, वेअर हाऊसेस व कोठारांची व्यवस्था सरकारनें करून द्यावी व त्यास सहकारी चळवळीनें मदत करावी अशी मागणी करणें सहाजिकच आहे. ह्या दृष्टीनें या प्रश्नांचा विचार परिषदेमध्यें व्हावा अशी आमची सूचना आहे. अलीकडे राहण्याच्या जागांची फार अडचण भासत आहे व त्या दृष्टीनें हाउसिंग सोसायटयांच्या अडचणी व मुख्यत: त्यांना मिळावयाची जमीन व इमारतीसाठी लागणारा मालमसाला, त्याचप्रमाणें अल्प व्याजानें कर्जाची आवश्यकता यांचा विचार होणें जरूर आहे. वर प्रदर्शित केलेल्या विचारांचा उपयोग महाराष्ट्र सहकारी परिषदेचे घटक करून घेतील अशी आम्हांस आशा आहे. सहकारी चळवळीच्या दृष्टीनें सध्याचा काल फार आणीबाणीचा आहे. देशाच्या आर्थिक योजनेंत व शेतकी जीवनांत सहकारी चळवळीस अत्यंत महत्त्वाचें स्थान आहे. सहकारी चळवळीची पुनर्घटना करतांना केवळ भावनावश होऊन चालणार नाहीं, तर व्यावहारिक दृष्टिकोन व सहकारी चळवळीचें मुख्य अंग जें ऐच्छिक स्वरूप व त्याची नैतिक बाजू, यांचा विचार होऊन मगच चळवळीचा विस्तार व्हावयास पाहिजे आणि जर हीं दोन ध्येयें नजरेआड केलीं तर प्रथम ज्या वेळीं सहकारी चळवळीस आघात सोसावे लागले व त्यामुळें कित्येक वर्षें त्या संबंधीचे दोष पत्करावे लागले तसे प्रसंग पुन्हां न येण्याची दक्षता घेतली पाहिजे. सुदैवानें परिषदेचें नेतृत्व आज अखिलभारतीय कीर्तीचे व समतोल वृत्तीचे प्रा. ध. रा. गाडगीळ यांचेकडे असलेमुळें परिषद् यशस्वी होईल व मुंबई प्रांतांतील सहकारी चळवळीस योग्य तें मार्गदर्शन होईल ह्याबद्दल विश्वास वाटतो. सहकारी परिषदेस आम्हीं सुयश चिंतितों.

## सोव्हिएट रशिआंतील कर-पद्धति

लेखकः—ए. अँटोनॉव्ह अनुवादकः—ग. रा. जोग

कोणत्याही सरकारला उत्पन्नासाठी कर बसवावे लागतातच. सोव्हिएट रशिआंत कर कोणावर व कशा पद्धतीनें बसवितात ह्यासंबंधी खालील लेख 'अर्थ'च्या वाचकांना उद्‌बोधक वाटेल. व्यक्तींच्या उत्पन्नावरील प्राप्तिच्या करासंबंधींचा दुसरा अनुवादात्मक लेख पुढें सवडीप्रमाणें देण्यांत येईल.

भांडवलशाही राष्ट्रांतून ज्या तत्वावर करांची आकारणी व वसुली केली जाते, त्यापेक्षा फारच निराळ्या तत्वावर सोव्हिएट युनिअनमध्ये कर बसविले जातात; आणि असें असणें हें योग्यच आहे. कारण, सोव्हिएट युनिअनमध्यें संपत्तीच्या उत्पादनाची साधनें लोकांच्या मालकीचीं असून, त्या देशांतील अर्थव्यवस्थाही नियोजित केलेली असते. सोव्हिएट युनिअनमध्यें संपत्युत्पादनाच्या साधनांच्या सार्वजनिक मालकीचे दोन प्रकार आहेत. एक म्हणजे सरकारच्या मालकीची उत्पादन साधनें. दुसरा प्रकार सहकार्यानें वापरण्यांत येणाऱ्या संपत्युत्पादन साधनांचा होय. इतर देशांतून राष्ट्रीय संपत्तीचीं मुख्य साधनें खाजगी मालकीचीं असतात. अर्थव्यवस्थाच भिन्न असल्यावर करपद्धति भिन्न असणार हें ओघानेंच येतें. झारच्या अमदानींत राज्ययंत्र हें परपुष्ट व परभृत होतें. ह्या राज्ययंत्राचा सर्व करभार काम करणाऱ्या वर्गावर मुख्यतः लादलेला होता. रशिअन साम्राज्याचा एकंदर कराच्या उत्पन्नापैकीं निदान ८७ टक्के भाग अप्रत्यक्ष कराच्या रूपानें उभारला जात असे. अप्रत्यक्ष कर म्हणजे चरितार्थाच्या वस्तूंवरील कर असा अर्थ आहे. उदाहरणार्थ कापड, काड्याच्या पेट्या, तंबाखू इत्यादींवरील कर. सन १९१३ सालांत तर अशी स्थिति होती कीं, सरकारच्या एकूण अप्रत्यक्ष कराच्या उत्पन्नापैकीं ५९ टक्के भाग दारूवरील करापासून वसूल केलेला होता.

सोव्हिएट राज्यव्यवस्था प्रस्थापित झाल्यापासून हळुहळु अनुभवाला अनुसरून सोव्हिएट युनियनमधील करपद्धति परिणत व पूर्ण होत गेली. ह्या करपद्धतीचीं मूलतत्वें समजण्यास अतिशय सोपीं आणि स्पष्ट आहेत. सोव्हिएट युनिअनमध्यें अप्रत्यक्ष कर आतां जवळ जवळ नाहींतच असें म्हटलें तरी चालेल. प्रत्यक्ष कर घेण्याच्या तीन पद्धति आहेत.

(१) सरकारी मालकीच्या कारखान्यांच्या उलाढालीवर आणि नफ्यावर घेण्यांत येणारा कर, (२) सहकारी संस्थांच्या उलाढालीवर आणि उत्पन्नावर घेण्यांत येणारा कर आणि (३) व्यक्तींच्या उत्पन्नावर घेण्यांत येणारा कर. प्रथम सामाजिक मालकीच्या उत्पादक संस्थांकडून घेण्यांत येणाऱ्या कराचा विचार करूं या. त्यासाठी सरकारी मालकीच्या व सहकारी मालकीच्या उत्पादक संस्थांचा वेगवेगळा विचार करणें जरूर आहे.

### सरकारी मालकीच्या उत्पादक-संस्थांवरील कर

प्रथमतः हें लक्षांत ठेवलें पाहिजे कीं, समाजवादी देशांत उद्योगधंदे सार्वजनिक मालकीचे असून, त्यांचा कारभार व व्यवहार खाजगी नफ्यासाठीं चालविण्यांत येत नाहीं. हे उद्योगधंदे सर्व लोकांच्या हितासाठींच चालविले जातात. अर्थातच, सरकारच्या उत्पन्नापैकीं खूप मोठा हिस्सा उद्योगधंद्यांच्या उत्पादनांतूनच उभारला जातो. पण ह्या ठिकाणीं असा प्रश्न उभा रहातो कीं, सरकारच्याच मालकीच्या कारखान्यावर कर बसविण्याची काय जरूर आहे? ते कशासाठी बसविले जातात? ह्या कारखान्यांतून उत्पन्न होणारा सर्वच नफा जर सरकारच्या मालकीचा आहे तर वेगळा कर कां म्हणून बसविण्यांत येतो? सरकारच्या मालकीच्या कारखान्यांत होणारा नफा जर सर्वच्या सर्व सरकारच्या अंदाजपत्रकांत जमेच्या बाजूला दाखविता आला असता तर काम फारच सोपें झालें असतें आणि सोव्हिएट युनिअनमध्यें रेल्वे आणि पोष्ट व तारखातें ह्यांच्यासारख्या सामाजिक सुखसोयींच्या खात्यांचें उत्पन्न सरळ अंदाजपत्रकांत अंतर्भूत करण्यांत येतेंही. पण औद्योगिक कारखान्यांच्या बाबतींत हीच पद्धत स्वीकारली तर पुढाकार घेऊन काम करण्याच्या वृत्तीला जखडून टाकल्यासारखे होईल; त्यामुळें कारखान्यांच्या व संस्थांच्या चालकांची जबाबदारीची जाणीव कमी होण्याचा संभव आहे. म्हणून कारखान्यांचे नफे जसेच्या तसे सरकारी अंदाजपत्रकांत घेत नाहींत. त्या ऐवजी, प्रत्येक कारखान्याचे स्वतंत्र अंदाज-पत्रक व ताळेबंद ठेवण्यांत येतो आणि प्रत्येक कारखान्याकडून सरकारी अंदाजपत्रकासाठी कराच्या रूपानें रक्कम वसूल करण्यांत येते. ह्या पद्धतिमुळें चालकांची पुढाकार घेण्याची वृत्ति व कार्यक्षमता ह्यांचा सरकारला फायदा मिळतो. सोव्हिएट अर्थव्यवस्थेंत वरील गुणांना अवकाश मिळत नाहीं, ते नष्ट होतात, हें टीकाकारांचे म्हणणें खरें नाहीं.

### उलाढालीवरील आणि नफ्यावरील कर

सरकारी मालकीचे कारखाने दोन प्रकारचे कर देतात. (१) उलाढालीवरील कर आणि (२) नफ्यावरील कर. उलाढालीवरील कर हा प्रत्येक कारखान्याकडून त्याचा माल विकला गेल्यावर अगर त्याची विल्हेवाट लागल्यावर घेण्यांत येतो. उलाढालीवरील कराचा दर निरनिराळ्या उद्योगधंद्यांना वेगवेगळा असतो. एकाच तऱ्हेचे कारखाने भिन्न परिस्थितींत उत्पादन करीत असले तरीही कराचा दर वेगवेगळा असतो. कराचा दर ठरवितांना उत्पादनाची किंमत आणि घाऊक किंमती ह्यांचा पूर्ण विचार करून दर कमी-अधिक ठरविले जातात. उदाहरणार्थ, अवजड यंत्रसाहित्य तयार करण्याचे उद्योगधंदे घेऊं. ह्या धंद्यांतून उत्पन्न झालेली यंत्रसामुग्री व इतर वस्तू उत्पादनाच्या किंमतीपेक्षां अगदी थोडी अधिक किंमत घेऊन विकल्या जातात. त्यामुळें अशा प्रकारच्या उद्योगधंद्यावर बसविण्यांत येणाऱ्या कराचा दर फारच कमी असतो; कांहीं कारखान्यांना तर हा कर अजिबात माफ असतो. इतर प्रकारच्या, उदाहरणार्थ तंबाखूच्या आणि दारू गाळण्याच्या, कारखान्यांतून तयार होणाऱ्या मालाची उत्पादनाची किंमत आणि घाऊक किंमत ह्यांत अधिक अंतर असते, त्यामुळें अर्थातच उलाढालीवरील कराचा दरही अधिक बसतो. नफ्यावरील कराच्या दरांतही असाच फरक असतो. नफ्यावरील कराचा दर हा एखादा कारखाना नवीन भांडवल किती गुंतवीत आहे, त्यावर मुख्यतः अवलंबून असतो. समजा, एखाद्या कारखान्यांत नवीन यंत्रसामुग्री बसविण्याची योजना आखली गेली असली, तर त्या कारखान्याला शेकडा १० पेक्षांही कमी नफ्यावरील कर द्यावा लागेल. परंतु ज्या कारखान्यानें आपला व्याप व विस्तार वाढवून उत्पादन वाढविण्याचा उद्देश समोर ठेवलेला नाहीं त्याला अधिक भांडवलाची गरज नसल्यामुळें, नफ्यापैकीं ९१ टक्के नफा, कर म्हणून द्यावा लागेल. फक्त ९ टक्केच नफा त्याच्या पदरीं राहील. सोव्हिएट सरकारच्या अंदाजपत्रकांतील फार मोठें उत्पन्न ह्या दोन प्रकारच्या करांपासून मिळालेलें असते. सरकारच्या १९३७ सालच्या अंदाजपत्रकांतील ९१·८ टक्के उत्पन्न ह्या करापासून मिळालेलें होतें.

## हिंदुस्थानांतील धरणांच्या योजना

हिंदुस्थान सारख्या शेतीप्रधान व वाढत्या लोकसंख्येच्या देशांत मोठाल्या धरणांचें महत्त्व फार आहे. हिंदुस्थानची लोकसंख्या दरवर्षी ४० ते ५० लाखांनीं वाढते असा अंदाज आहे. ह्या वाढत्या लोकसंख्येचे राहाणीचें मान वाढवावयाचें, तर त्यासाठी मोठमोठीं पाटबंधाऱ्याचीं कामें पुरीं होणें अत्यंत आवश्यक आहे. धरणांच्या पाण्याचे मुख्यतः दोन उपयोग महत्त्वाचे असतात : ( १ ) शेतीला हुकमी पाणीपुरवठा आणि ( २ ) औद्योगिक कारखान्यासाठी प्रेरक शक्ती. हिंदुस्थानांतील नद्यांवर धरणें बांधून सुमारें ९ कोटि, ७० लाख किलोवॅट विजेची शक्ती निर्माण करतां येईल असें म्हणतात. ह्या संभाव्य उत्पादनापैकीं आज फक्त ५ लाख किलोवॅट शक्ती निर्माण करण्यांत येत आहे. १५ ऑगस्ट नंतर मिळालेल्या स्वातंत्र्याच्या वातावरणांत,अशी धरणें बांधण्याच्या मार्गांतील अडचणी दूर झालेल्या असून कांहीं मोठ्या धरणांसंबंधीं कामें चालू झालीं आहेत. ह्या धरणाच्या योजनांपैकीं कांहीं प्रमुख योजनांचा गोषवारा पुढें दिला आहे.

**दामोदर नदीवरील योजना:**—ह्या योजनेंत बिहार प्रांतांतील ८ धरणांचा समावेश होतो. त्यासाठीं अंदाजें ५५ कोटि रुपये खर्च होईल. धरणें पुरी होण्यास १५ ते २० वर्षें लागतील. योजना पुरी झाल्यावर बंगालमध्यें दामोदर नदीच्या पुरामुळें होणारें नुकसान टळेल. सुमारें ९,६७,००० एकर जमीन पाण्याखालीं येईल आणि ३,००,००० किलोवॅट वीज शक्ती निर्माण होईल. ही योजना औद्योगिक दृष्ट्या विकास झालेल्या भागांतच होत असल्यानें बंगाल-बिहारमधील औद्योगिक प्रगति आणखीच झपाट्यानें होईल. दामोदर व्हॅली योजना अमेरिकेंतील टेनेसी व्हॅली ॲथॉरिटीच्या योजनेवर आधारलेली आहे. नदीच्या उगमापासून ते मुखापर्यंत नदीच्या सर्व पात्राचा एकत्र विचार करून तिच्या पाण्याचा जास्तींत जास्त उपयोग करण्याचा ह्या योजनेचा उद्देश आहे. त्यासाठी दामोदर व्हॅली कॉर्पोरेशन नांवाची संघटना स्थापन करण्यांत येणार आहे. कॉर्पोरेशनचा कारभार तीन सभासदांच्या एका बोर्डाकडे रहाणार आहे. बोर्डाचा अध्यक्ष हिंदुस्थान सरकारनें नेमावयाचा आहे. वीज–निर्मितीच्या योजनेचा खर्च बंगाल, बिहार व हिंदुस्थान सरकार सारखा वांटून घेणार असून, पुरापासून संरक्षण करण्याच्या योजनेच्या खर्चांतील निम्मा खर्च बंगाल व निम्मा मध्यवर्ती सरकार सोसणार आहे. योजनेच्या बहुविध उद्देशांत कलकत्त्याच्या बंदराची सुधारणा करणें हाहि एक महत्त्वाचा उद्देश आहे. योजनेंतील ८ धरणांपैकीं दोन धरणांच्या कामाला ह्याच महिन्यांत प्रारंभ होईल असा अंदाज आहे.

**हिराकुंड धरण:**—ओरिसा प्रांतांतील महानदीवर सांबळपूर-पासून ९ मैलावर हिराकुंड धरण होणार आहे. धरण पुरें झाल्यावर ओरिसांतील १०,९४,९५२ एकर जमीन नव्यानें धरणाच्या पाण्याखालीं येणार आहे. ह्या शिवाय ३,५०,००० किलोवॅट शक्ती निर्माण करण्याची योजना असून, धरणामुळें महानदी वहातुकीला अधिक सोईची होणार आहे. हिराकुंड योजनेंतील दुसरें धरण ताकारपारा येथें बांधण्यांत येणार आहे. हिराकुंड धरणाला खर्च ४७ कोटी, ८१ लाख रुपये येईल असा अंदाज आहे. प्रत्यक्ष कामाला प्रारंभ चालू सालींच होईल असें म्हणतात. हिराकुंड धरणाचा नमुना सुचविण्यासाठी जी तांत्रिक संघटना उभारण्यांत येणार आहे तीच देशांतील इतर धरणांच्या नमुन्यांचाही विचार करणार आहे. ह्या तांत्रिक संघटनेला सुप्रसिद्ध हिंदी एंजिनियर सर एम्. विश्वेश्वर अय्या ह्यांची सल्लामसलत लाभणार आहे.

**रामपद्सागर योजना:**—मद्रास प्रांतांत गोदावरी नदीवर होऊं पहाणारें हें धरण जगांतील मोठ्या धरणांपैकीं एक होईल. ह्या धरणाच्या भिंतींची उंची १५० फूट धरण्यांत आलेली असून, नदीच्या तळाखालीं भिंतीचा पाया २०० फूट घेतला जाईल. धरणाच्या पाण्याचा विस्तार १½ कोटी एकर होईल.त्याची लांबी १॥ मैल होईल, आणि त्यामुळें ६,००,००० कोरडवाहू जमीन भिजेल. धरणाला खर्च ८६ कोटी रुपये येईल आणि तें पुरें होण्यास १२ वर्षें लागतील असा अंदाज आहे. रामपद्सागर योजनेच्या खालो-खाल तुंगभद्रेवरील धरण येतें. हें धरण मद्रास सरकार आणि हैद्राबाद संस्थान मिळून बांधीत असून ह्या वर्षअखेर धरणाचें प्राथमिक बांधकाम पुरें होईल. धरण ८,२०० फूट लांब आणि १४० फूट उंच होईल. धरणाचा फायदा मद्रास व हैद्राबाद सारखाच घेणार असून, त्यामुळें २ कोटी, ६० लाख एकरांस पाण्याचा फायदा मिळणार आहे.

**कोसी नदीवरील योजना:**—नेपाळमधील कोसीनदीवरील धरण जगांतील सगळ्यांत उंच धरण होईल. ह्या धरणाची उंची ६५० फूट होईल. अमेरिकेंतील बोल्डर धरणाची उंची ७२६ फूट आहे. धरणाच्या पाण्याचा क्षेत्र–विस्तार १ कोटि, १० लाख एकर होईल. धरणावर १ कोटी, ८० लाख किलोवॅट वीजशक्ति निर्माण होऊं शकेल. ही योजनाही दामोदर नदीवरील योजने-प्रमाणेंच बहुविध उद्दिष्टांची आहे. योजनेला १०० कोटी रुपये खर्च येईल आणि ती पुरी होण्यास सुमारें १० वर्षें लागतील असा अंदाज आहे.

मुंबई प्रांतांत गिरणेवर व नाशिकजवळ गोदावरीवर धरणें होणार आहेत. परंतु अजून मुंबई प्रांतांतील धरणांसंबंधीं प्रत्यक्ष कामाला प्रारंभ झालेला नाहीं. योजनांपैकीं वीर धरण पुरें झाल्यावर ८०,००० एकर जमीन भिजेल. ह्याशिवाय माही व तापीवरील कालवे पुरे झाल्यावर, अनुक्रमें ३,००,००० व २,३०,००० एकर जमीन बागाइतींत मोडूं लागेल.

### पाकिस्तानची १० कोटींची कर्जाची मागणी

पाकिस्तान सरकार रिझर्व्ह बँकेकडून १० कोटी रुपयांचें कर्ज मिळविण्याच्या खटपटींत आहे अशी बातमी आहे. रिझर्व्ह बँकेला कायद्याप्रमाणें पौंडांचे अगर रुपयांचे रोखे ह्यांच्यावरच कर्ज देतां येतें; पाकिस्तानच्या रोख्यावर कर्ज देतां येत नाहीं. तथापि तात्पुरतें म्हणून अल्प मुदतीचें कर्ज देतां येईल. पाकि-स्तानला पश्चिम पंजाब व सिंध ह्यांच्या खात्यांवरील पैसे मात्र मिळूं शकतील.

### प्रासाद बांधणाऱ्यांना सामुग्री मिळणार नाहीं

५० हजार रुपयांच्या पेक्षां अधिक किंमतीच्या इमारती बांध-ण्याला संयुक्त-प्रांत सरकारनें अप्रत्यक्ष रीत्या बंदीच घातली आहे. अशा इमारतींना सीमेंट, लोखंड व पोलाद देण्यांत येणार नाहीं. बांधकामाच्या सामानाची योग्य वांटणी करण्याचा हेतू ह्या योजने-मागें आहे.

तयार कपड्यांचे व्यापारी महिंद्रकर ब्रदर्स गिरगांव, मुंबई नं. ४ व बुधवार चौक, पुणें

पुणें सें. कों. बँकेचा सहकारी सप्ताह

व्याख्यान १ लें, ता. २६–१०–४७

## शेतीचा अर्थव्यवहार

### ( प्रा. धनंजयराव गाडगीळ )


" शेतीचा व्यवसाय करतांना तिच्या अर्थव्यवहाराकडे दुर्लक्ष करून चालणार नाहीं. ज्या कारणाकरितां कर्ज काढलें असेल त्या कारणांतून किफायतशीर उत्पन्न होऊन कर्ज फिटलें तर तो व्यवहार नीट झाला असें समजलें पाहिजे. शेतीचा अर्थव्यवहार निसर्ग, सातत्यानें काम करण्याची शेतकऱ्याची कुवत व शेतीच्या पैदाशीचा योग्य मोबदला या गोष्टींवर अवलंबून आहे. शेतकऱ्याचा अर्थव्यवहार इतका गुंतागुंतीचा आहे कीं वरील बाबींपैकी एकादी गोष्ट जरी प्रतिकूल असेल तर सर्वच व्यवहार अंगलट येऊन शेतकरी कर्जांत जास्त जास्त खचत जातो. कर्ज काढण्याशिवाय गत्यंतर नसतें अशा परिस्थितींत शेतकरी सधन होणें अशक्य. फार तर जेमतेम तोंडमिळवणी होते.

" शेतकरी समाज बहुसंख्य असल्यामुळें शेतीची व तिच्या अर्थव्यवहाराची पुनर्घटना होणें जरूर आहे. कारण, ती राष्ट्रीय उत्पादनाची बाब असून ती जर कमकुवत व ठिसूळ पायावर उभारणा होईल तर राष्ट्रीय उत्पादनावर त्याचा मोठा परिणाम होईल. सरकारनें याबाबत चौकशी करून अहवाल सादर करण्यासाठी निरनिराळ्या समित्या नेमिल्या आहेत. त्या सर्वांचा निष्कर्ष हा कीं शेतीच्या अर्थव्यवहारावर शेतीची पुनर्घटना अवलंबून आहे. सावकारी नियंत्रण, कर्जनिवारण असे कायदे उपयुक्त असले तरी ते तोडगा होऊं शकत नाहींत. नियंत्रण आवश्यक असलें तरी तें विवेकी नियंत्रण असावें. अविवेकी नियंत्रणामुळें घोटाळे उत्पन्न होऊन काळा बाजार वाढण्याची प्रवृत्ति फैलावते. सहकारी चळवळीची सध्यांची परिस्थिति व कुवत पाहतां शेतीच्या अर्थव्यवहाराचा प्रश्न सोडविण्यास त्यांचा उपयोग होणार नाहीं. कारण हल्लीचा सहकारी चळवळीचा विस्तार व कार्यपद्धति पोषक नाहीं. शेतकऱ्यांना शेतीच्या व्यवसायासाठीं माफक दरानें कर्ज मिळण्याचे कामीं सरकारनें पुढाकार घेतला पाहिजे. सहकारी अगर निमसरकारी संस्थेमार्फत शेतकऱ्यांना अल्प व्याजाच्या दरानें सर्व कर्जें मिळण्याची तरतूद करून शेतकऱ्यांना हलके हलके त्यांच्या पायावर उभे रहाण्याची शक्यता निर्माण केली पाहिजे. हें कार्य बिकट व त्रासाचें आहे. तथापि तें होणें जरूर आहे. शेतीचा व्यवसाय सुदृढ कसा होईल हें पाहून त्याची अर्थशास्त्राशीं सांगड घातली गेली पाहिजे.


---

### औद्योगिक वृत्त–विशेष

**स्टोव्हजच्या निर्मितीचा उपक्रम** उद्यम इंजिनिअरिंग लि. चा कारखाना लवकरच हातीं घेणार आहे. **रबरी खेळण्याच्या एका पेटंटची खरेदी** स्वस्तिक रबर प्रॉडक्ट्स लि. नें अमेरिकेंत केली. **लोणावळा** हें कारखान्यांचें केंद्र बनूं लागलें आहे. बडोदा आयुर्वेदाश्रम अँड फार्मास्युटिकल वर्क्स लि. ची मुख्य कचेरी तेथें गेली असून तेथील त्यांचा कारखाना लवकरच सुरू होईल. **नीरा विक्रीच्या** मुंबई सरकारच्या योजनेस नीरा विक्री केंद्रें उघडून बी. तांबे लि., मुंबई, हे सहाय्य करीत आहेत. **ब्लेड्सचे हिंदुस्थानांत उत्पादन** करण्यांत इंडियन ब्लेड्स अँड शार्प मेटालिक्स लि., पुणें, ही कंपनी पुढाकार घेऊन ग्वाल्हेर येथें लवकरच काम सुरू करणार आहे. ( पॅरेमाउंट पब्लिसिटी लि. मार्फत )


पेडणेकर आणि कंपनी लि.,



शिवण्याच्या यंत्रांचे व्यापारी.


१७२ गिरगांव रोड, मुंबई.

फोन नं. २२७३८

आमचे प्रमुख जाहिरात प्रतिनिधी

★ दत्तात्रय रामचंद्र कुलकर्णी ★

९६ नारायण पेठ, पुणें २.



अधिक धान्य पिकविण्याची योजना

—यशस्वी होण्यास—

किर्लोस्कर पंपिंग सेट्स

हें अमोघ साधन आहे.

त्याचें सहाय घ्या !

किर्लोस्कर बंधु, लिमिटेड . . . . किर्लोस्करवाडी

## महाराष्ट्र विभाग सहकारी परिषद्

अध्यक्ष : प्रा. धनंजयराव गाडगीळ

**शनिवार, ता. १७-१-४८** दुपारीं १ वाजतां स्वागतपर पद्य, स्वागताध्यक्षांचें भाषण, संदेश वाचन, अध्यक्षांचें भाषण व विषय नियामक मंडळाची प्रतिनिधींकडून निवड.

**रविवार १८-१-४८** सकाळीं ८-३० वाजतां, ठरावांवरील चर्चा व दुपारीं ३-३० वाजतां ठरावांवरील राहिलेली चर्चा, अध्यक्षांचें समारोपाचें भाषण, आभारप्रदर्शन, पानसुपारी व राष्ट्रगीत.

### परिषदेस देणग्या

मुंबई प्रां. सहकारी इन्स्टिट्यूटनें परिषदेसाठी मंजूर केलेल्या रकमे व्यतिरिक्त, खालील ठळक देणग्या सहकारी संस्थांनीं दिल्या आहेत.

| | रुपये |
|---|---|
| पुणें सें. को. बँक लि. | २५१ |
| पुणें जिल्हा खरेदी विक्री संघ म. | २५१ |
| मुंबई प्रां. स. बँक लि. | १५० |

### चालकांची विनंति

परिषदेसाठी चालकांनीं निमंत्रणें पाठविलींच आहेत. परंतु, अधिकृत प्रतिनिधींना त्यांचें निमंत्रण चुकून पोचावयाचें राहिलें तरी त्यांनीं अगत्यपूर्वक परिषदेस उपस्थित व्हावें, अशी चालकांची विनंति आहे.

### शिमोगा येथील साखरेचा नवा कारखाना

म्हैसूर संस्थानांत मंड्या येथें म्हैसूर शुगर कं. लि. चा एक साखर कारखाना आहे, त्यांत ३०,००० टन ऊस सालिना गाळला जातो. रोज ८०० ते १००० टन ऊस गाळणारा आणखी एक कारखाना आतां स्थापन होण्यास हिंदुस्थान सरकारनें, यंत्रसामुग्रीच्या आयातीस मान्यता देऊन, परवानगी दिली आहे. शिमोगा येथें हा कारखाना उभारण्यांत येईल. त्यासाठी एक लिमिटेड कंपनी स्थापिली जाईल, तिच्या भांडवलाच्या ५५% भाग म्हैसूर सरकारच विकत घेईल. म्हैसूर शुगर कंपनीमध्येंहि म्हैसूर सरकारचें ५५% भांडवल आहे. कंपनी स्थापन करणें, फॅक्टरीसाठी जागा निवडणें, मशिनरी निवडणें, इत्यादींसाठी म्हैसूर सरकारनें एक तात्पुरतें डायरेक्टर बोर्ड नेमलें असून प्राथमिक खर्चासाठीं १०,००० रु. त्याच्या हवाली केले आहेत.

## कॅलेंडरांची साभार पोंच

(१) व्ही. पी. बेडेकर आणि सन्स लि., मसालेवाले, मुगभाट, गिरगांव, मुंबई.

(२) दत्तात्रय नारायण हेजीब, किराणा व सुकामेव्याचे व्यापारी, २० शुक्रवार, पुणें २.

(३) श्री कृष्णा-वेणी छापखाना, लिंब, जि. सातारा.

(४) के. टी. डोंगरे आणि कं., डोंगरे बालामृत, मुंबई ४.

(५) दि बेंगॉल कोल सप्लाइंग फर्म, कोल- कोक मर्चंट्स, गव्हर्मेंट कॉन्ट्रॅक्टर्स अँड प्रिंटर्स, ५११ बुधवार, पुणें २

(६) शं. वि. सोवनी, सायन्स सामानाचे कारखानदार, गिरगांव रोड, मुंबई ४

(७) स्वस्तिक रबर प्रॉडक्टस लि., सर्व प्रकारच्या रबरी वस्तूंचे कारखानदार, शुक्रवार, पुणें २

### ग्रेट ब्रिटनच्या पश्चिम आफ्रिकेंतील वसाहती

हिंदुस्थान, ब्रह्मदेश, ह्यासारखे देश आतां स्वतंत्र झाले असल्याकारणानें ब्रिटिश साम्राज्य आतां पूर्वींच्या अर्थानें शिल्लक राहिलेलें नाहीं. ग्रेट ब्रिटन आज ज्या कांहीं देशांचा कारभार पहात आहे ते देशहि संयुक्त राष्ट्रसंघटनेच्या ट्रस्टीशिपखालीं जाण्याच्या मार्गावर आहेत. तेव्हां सहाजिकच उरलेल्या ब्रिटिश वसाहतींकडे ग्रेटब्रिटनचें लक्ष तीव्रतेनें वेधलें जाणें स्वाभाविक आहे. इजिप्तमधील ब्रिटिश वर्चस्व नष्ट झालें असलें आणि पॅलेस्टाइन व सुएझ कालवा ह्यांचें भवितव्य अनिश्चित असलें, तरी पश्चिम आफ्रिकेंतील गॅंबिया, सिएरा लिओन, गोल्ड कोस्ट व नैगेरिया ह्या ब्रिटीश वसाहती पूर्णपणें "सुरक्षित" आहेत. ह्या सर्वांचें मिळून क्षेत्रफळ ५,००,००० चौ. मैल म्हणजे ग्रेट ब्रिटनच्या क्षेत्रफळाच्या पांचपटीइतकें आहे. युद्धकाळांत ह्या वसाहतींनीं पुष्कळच प्रगति केलेली आहे. हिरे, मँगेनीज, बक्साइट, लोखंड, इत्यादींचें उत्पादन तेथें बऱ्याच मोठ्या प्रमाणांत वाढण्यास वाव आहे. तेथील लोक (२,७०,००,०००) अत्यंत मागासलेले आहेत आणि तेथील नैसर्गिक साधनांचा उपयोगहि अद्याप पुरेसा करण्याचा प्रयत्न झालेला नाहीं. फ्रान्स आणि बेल्जम ह्यांच्याहि मोठाल्या वसाहती शेजारी आहेत. त्या सर्वांचीच प्रगति एकसूत्री धोरणानें घडवून आणण्याचा ह्या सांम्राज्यशाही राष्ट्रांचा प्रयत्न चालू राहील हें उघड आहे.

**ग्रेट ब्रिटनमध्यें परदेशी प्रवासी येऊन डॉलर देणार**—ग्रेट ब्रिटनमध्यें चालू वर्षीं परदेशांतून सुमारें ४ लक्ष प्रवासी येतील असा अंदाज आहे. त्यांत एकटे अमेरिकनच १ लाखावर भरतील. २९ जुलै ते १४ ऑगस्ट अखेर ऑलिंपिकचे सामने होणार आहेत, त्यांत सर्व जगांतील मिळून सुमारें ६,००० उमेदवार भाग घेणार आहेत. २४ जुलै रोजीं, म्हणजे बर्नार्ड शॉच्या ९२ व्या वाढदिवशीं, त्याच्या सन्मानार्थ मॅलव्हर्न यात्रा भरणार आहे. त्याप्रीत्यर्थ शॉनें एक स्वतंत्र नाटक लिहिलें आहे. ऑलिंपिक सामने व वरील यात्रा हीं ग्रेट ब्रिटनला बरेच डॉलर मिळवून देतील अशी अपेक्षा आहे.

**वीजनिर्मितीची यंत्रसामुग्री**—पडत्या पाण्याच्या शक्तीवर वीज निर्माण करण्याचीं केंद्रें हिंदुस्थानाप्रमाणें इतर देशांतहि मोठ्या प्रमाणावर सुरू करण्यांत येत आहेत. त्यासाठी लागणारी यंत्रसामुग्री पुरविण्याचीं कामें ब्रिटिश कारखानदारांना मिळत आहेत. युरोपांत वीजनिर्मितीसाठी पुष्कळच यंत्रसामुग्री लागेल ती ब्रिटिश कंपन्याच पुरवितील. ह्या यंत्रसामुग्रीची निर्गत ब्रिटिश आर्थिक संसारास उत्कृष्ट हातभार लावील.

**हिंद टाइपरायटर्स लि.**—हिंदी टाइपरायटर्स, टेलिप्रिंटर्स, इत्यादींचें उत्पादन करण्यासाठी वरील २५ लक्ष रु. भांडवलाची नवी कंपनी मुंबई येथें स्थापन होत आहे.




कंपनी सभा–वृत्त

# चितळे ॲग्रिकल्चरल प्रॉडक्टस लि. ची सातवी वार्षिक सर्वसाधारण सभा

## रावबहादुर एन्. बी. देशमुख यांचें अध्यक्षीय भाषण

### चितळे बंधूंच्या मार्गदर्शनाखाली व व्यवस्थेखाली कंपनीनें प्रगतिपथावरील गांठलेला सातवा यशस्वी टप्पा

सोलापूर जिल्ह्यांतील माळशिरस नजीकच्या रुक्ष माळरानाची मशागत करून त्याला आधुनिक वसाहतीचें स्वरूप अल्पकाळांत देण्यांत या कंपनीला आलेलें यश महाराष्ट्राच्या परिचयाचेंच आहे. मेसर्स चितळे ब्रदर्स यांच्या तडफदार कर्तबगारीचें मूर्तिमंत प्रतीक म्हणजेच ही कंपनी होय.

या कंपनीची सातवी वार्षिक सर्वसाधारण सभा कंपनीच्या रजिस्टर्ड ऑफिसमध्यें ता. १६ डिसेंबर १९४७ रोजीं झाली. या प्रसंगी कंपनीचे एक डायरेक्टर रावबहादुर एन्. बी. देशमुख यांनीं आपल्या भाषणांत प्रथमतः कंपनीचे अध्यक्ष डॉ. आर. एच. भडकमकर यांच्या कुशल मार्गदर्शकत्वाचा उल्लेख केला व पुढील सालीं ते पुनः सभेला हजर राहूं शकतील अशी आशा व्यक्त केली. नंतर कंपनीच्या सातव्या वार्षिक अहवालाचा परामर्श घेतांना ते म्हणाले, या अहवालांत ३१ जुलै १९४७ अखेरची परिस्थिती चित्रित झालेली आपणांस दिसत तथापि त्यानंतर आजच्या घडकेला चितळेनगरची परिस्थिती काय आहे तें मीं आपणांस सांगणार आहे. "चक्षुर्वै सत्यम्" या न्यायानें गेले चारपांच दिवस मीं येथें राहून आलो; आणि माझी आपणाला अशी विनंती आहे कीं आपणसुद्धां सवडीनुसार तेथें जाऊन अवश्य खात्री करून घ्यावी. कंपनीकडे आज जवळ जवळ चार हजार एकर जमीन असून त्यांतील एक हजार एकर जमिनींत ऊस लावण्याची मॅनेजिंग एजंटसची महत्त्वाकांक्षा आहे.

कंपनीनें द्राक्षाच्या लागवडींत केलेली प्रगति तर खरोखरीच अपूर्व आहे. चार, पांच निराळ्या जातींचीं द्राक्षे कंपनीच्या मळ्यांत आतां उत्कृष्ट तयार होतात. एक नव्हे, दोन नव्हे, चौदा एकर जमीन द्राक्षाच्या लागवडीखालीं आणून कंपनीच्या मेहनती मॅनेजिंग एजंटांनीं खरोखर कमाल केली आहे. फळबागांच्या शेतीच्या नव्या क्षेत्रांत पदार्पण करून अल्पकाळांत त्यांत उत्तम प्रकारचें यश संपादन केल्याचें सर्व श्रेय मेसर्स चितळे बंधू यांनाच आहे हें निराळें सांगणें नकोच.

सध्याच्या अन्नटंचाईच्या काळांत अन्नधान्याची लागवड ही बाब अत्यंत महत्त्वाची आहे. याहि क्षेत्रांत कंपनीनें मुद्दाम निर्देश करण्यासारखी कामगिरी केली आहे. कंपनी, जवळ जवळ दोन हजार एकरांत अन्नधान्याचें उत्पादन आधुनिक पद्धतीनें करीत आहे. कंपनीच्या हिशेबाच्या सर्व वह्या मी स्वतः बारकाईनें पाहिल्या असून, हिशेबाची पद्धती अत्यंत उत्कृष्ट, खुलासेवार, आधुनिक पद्धतीची व चिकित्सिक माणसाचेंहि पूर्ण समाधान करणारी आहे.

मॅनेजिंग एजंट्स, मेसर्स चितळे बंधु, आपल्या धंद्याच्या तांत्रिक व यांत्रिक क्षेत्रांत तरबेज आहेत हें आतां निराळें सिद्ध करण्याची जरूरी राहिली नाहीं. तांत्रिक व यांत्रिक कुशलतेबरोबरच सचोटी, खर्चीत काटकसर, अविश्रान्त मेहनत करण्याची पात्रता व इच्छा या गुणांची जोड असणें अत्यंत आवश्यक आहे. ती चितळे बंधूंचे मध्यें आहे.

कंपनीची प्रगती मेसर्स चितळे ब्रदर्स यांच्यासारख्या कार्यक्षम आणि मेहनती बंधुद्वयांच्या हातीं निश्चितपणें होत जाईल अशी माझी बालंबाल खात्री आहे.

कंपनीच्या कामाचा व्याप वाढत असल्यामुळें आणखी आठ लाखांचें नवीन भांडवल विक्रीस काढण्याचा संचालक मंडळाचा विचार आहे. आपलें भांडवल या कंपनींत अत्यंत सुरक्षित आहे, इतकेंच नव्हे तर पुनः भांडवल गुंतवावयाचें झाल्यास याच कंपनींत गुंतवावें असें मी कंपनीच्या एकूण मालमत्तेची व उत्पादनाची प्रत्यक्ष परिस्थिती पाहून आग्रहानें आपणांस सांगू शकतो. मला पुनः एकदां आपल्याला सांगावयाचें आहे कीं, ताळेबंदांतील प्रत्येक आंकडा हा ठिकाणावरील मालमत्तेचा खराखुरा निदर्शक असून एकंदर मालमत्तेवरील व उत्पादनावरील खर्चेहि अत्यंत माफक आहे.

अध्यक्षांच्या भाषणानंतर अहवालाच्या मंजूरीचा ठराव सर्वानुमतें मंजूर झाला.

कंपनीच्या प्रेफरन्स भागांवर व ऑर्डिनरी व न्यू ऑर्डिनरी भागांवर ६ टक्के करमाफ नफा द्यावा हा ठरावहि सर्वानुमतें मंजूर झाला. कंपनीचे निवृत्त संचालक श्री. डी. आर. नाईक आणि श्री. अस्. के. भावे यांना पुनः डायरेक्टर निवडण्याचा ठरावहि सर्वानुमतें पास झाला. नवीन वर्षासाठी हिशेब-तपासनीस म्हणून मेसर्स जी. एम. ओक आणि कं. यांची गतसालच्याच वेतनावर नेमणूक करण्यांत आली.

वरील सभेचे काम संपल्यानंतर तीन वाजतां कंपनीच्या विशेष साधारण सभेस प्रारंभ झाला. कंपनीच्या वसूल शेअर भांडवलाच्या दुपटीपेक्षां केव्हांहि अधिक नाहीं इतक्या ठेवी घेण्याचा अधिकार संचालक मंडळाला देण्याचा ठराव श्री. डी. व्ही. केळकर यांनीं सभेपुढें मांडला; आणि श्री. पानवलकर यांनी त्याला अनुमोदन दिलें. यानंतर वरील ठरावाचा उद्देश अध्यक्षांनीं थोडक्यांत सभेला निवेदन केला. अध्यक्ष आपल्या भाषणांत म्हणाले कीं, शेतीच्या व्यवसायांत वेळेवर हाताशीं पैसा असणें ही बाब अत्यंत महत्त्वाची आहे. कंपनीचें शेअर-भांडवल वाढविण्याचा उद्देश मी आपल्या कानांवर घातला आहेच. तथापि, दरम्यानच्या काळांत जरूर लागलीं तर हाताशीं खेळता पैसा असावा म्हणूनच हा ठराव आपल्या पुढें मांडला आहे. कंपनीच्या वसूल भांडवलाशीं ठेवींचें प्रमाण काय असावें हा फार महत्वाचा प्रश्न आहे. या बाबतींत अनुभव असलेल्या तज्ज्ञांचें मत असें आहे कीं, वसूल शेअर-भांडवलाच्या दुपटीपेक्षां ठेवींचे प्रमाण केव्हांही अधिक असूं नये. वरील अनुभव जमेस धरूनच हा ठराव मांडलेला आहे. अध्यक्षांचें भाषणानंतर ठराव एकमतानें मंजूर झाला. नंतर श्री. डी. आर. नाईक यांनीं अध्यक्षांचे आभार मानल्यावर सभेचें काम संपलें. (कंपनीकडून)

हें पत्र पुणें, पेठ भांबुर्डा घ. नं. ११५।१ आर्यभूषण छापखान्यांत रा. विठ्ठल हरि बर्वे यांनीं छापिलें व
प्रो. रा. श्रीपाद वामन काळे, बी. ए. यांनीं 'दुर्गाधिवास,' ८२१ शिवाजीनगर (पो. ऑ. डेक्कन जिमखाना) पुणें ४ येथें प्रसिद्ध केलें.